**वाचले:-** १) अर्जदार सचिव रयत शिक्षण संस्था सातारा यांचा दिनांक - २९/१२/२०१६ रोजीचा अर्ज.
२) या कार्यालयाकडील जागा प्रदान आदेश क्र. पमग/४७१/III, दिनांक - ११/१२/१९७९
३) उपविभागीय अधिकारी दौंड-पुरंदर, उपविभाग पुरंदर यांचेकडील पत्र क्र. जमीन/कावि/१७७/२०१८, दिनांक - १५/०२/२०१८ रोजीचा अहवाल.
४) तहसिलदार पुरंदर यांचेकडील पत्र क्र. जमिन/कावि/५५/२०१७, दिनांक - १२/०१/२०१८ व पत्र क्र. जमिन/कावि/८१३/२०१८, दिनांक - ०४/०९/२०१८ रोजीचा अहवाल.
५) शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक - १६/११/२०१८.

---

जिल्हाधिकारी पुणे
सत्यमेव जयते

**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**
(महसूल शाखा)
क्र. पमन//सीआर/ ०७ /२०२०
पुणे -०१, दिनांक:- ०२/०७/२०२०
/२०२०.

**विषय:-** मौजे पांगारे, ता. पुरंदर, जि. पुणे येथील रयत शिक्षण संस्था सातारा यांचे न्यू इंग्लिश स्कुल पांगारे यांना शाळेच्या क्रिडांगणासाठी प्रदान केलेल्या १८५८.०० चौ.मी. जागेच्या भाडेपट्टयास मुदतवाढ देणेबाबत...

**आदेश:-**

ज्याअर्थी, मौजे पांगारे, ता. पुरंदर, जि. पुणे येथील १८५८.०० चौ.मी. जागा रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे न्यू इंग्लिश स्कुल पांगारे यांचे शाळेच्या क्रिडांगणाकरीता देणेबाबत मा. विभागीय आयुक्त पुणे, विभाग पुणे यांचेकडील ज्ञापन क्र. महसूल-२-जमीन(R)-५५३ दिनांक - १७/११/१९७९ अन्वये मान्यता दिलेली असून त्यानुसार जिल्हाधिकारी पुणे (महसूल शाखा) यांचेकडील आदेश क्र. पमग/४७१/III, दिनांक - ११/१२/१९७९ अन्वये सदर जागा क्रिडांगणासाठी रु. १/- नाममात्र भाडेपट्टयाने रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे न्यू इंग्लिश स्कुल पांगारे यांना प्रदान केली आहे.

२. ज्याअर्थी, अर्जदार संस्था यांनी दिनांक - २९/१२/२०१६ रोजीच्या अर्जान्वये त्यांना भाडेपट्टयाने देणेत आलेल्या जागेची मुदत दिनांक - १०/१२/१९९४ रोजी संपत असल्याने, तसेच यापुढेही सदरची जागा कायमपणे खेळाचे मैदानासाठी लागणार असल्याने जागेच्या भाडेपट्टयाची मुदत दिनांक - १०/१२/१९९४ पासून पुढील १५ वर्षाकरीता वाढवून मिळणेची विनंती केलेली आहे.

३. ज्याअर्थी, अर्जदार यांचे विनंतीचे अनुषंगाने तहसिलदार पुरंदर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जमिन/कावि /५५ /२०१७, दिनांक - १२/०१/२०१८ व पत्र क्र. जमिन/कावि/८१३/२०१८, दिनांक - ०४/०९/२०१८ व उपविभागीय अधिकारी दौंड पुरंदर, उपविभाग पुरंदर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जमीन/कावि/१७७/२०१८, दिनांक - १५/०२/२०१८ अन्वये मौजे पांगारे, ता. पुरंदर, जि. पुणे येथील रयत शिक्षण संस्था सातारा यांचे न्यू इंग्लिश स्कुल पांगारे शाळेच्या क्रिडांगणासाठी १५ वर्षे भाडेपट्टयाने दिलेल्या जमीनीस अर्जदार संस्थेच्या विनंतीनुसार मुदतवाढ देणेस हरकत नसलेबाबत अभिप्राय दिलेला आहे.

४. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ मध्ये संपुष्टात आलेल्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण मुळ जमीन प्रदान आदेशातील अटी व शर्तीच्या अटीन राहून, ३० वर्षे इतक्या कालावधीपर्यत करणेबाबत नमूद केले आहे. तसेच संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, अशा उक्त नमूद भाडेपट्टयांचे नुतनीकरण करण्यास सक्षम असलेबाबत नमूद केले आहे.

५. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ मधील तरतुदीनुसार या कार्यालयाकडील पत्र क्र. पमन/कावि/७३२/१८, दिनांक - २५/०७/२०१९ अन्वये कळविलेली भुईभाडयाची रक्कम रु. १८८/- ही पावती क्र. १८४२५६२ दिनांक - २३/१२/२०१९ व दिनांक - ०१/०१/१९९५ ते दिनांक - ३१/१२/२०१७ पर्यतची म्हणजेच २३ वर्षाकरीताची जुन्या दराने म्हणजेच रु. १/- प्रती वर्ष या दराने होणारी भुईभाडयाची रक्कम रु. २३/- ही पावती क्र. १८४२५६१ दिनांक - २८/०७/२०१९ अन्वये अर्जदार संस्था यांनी गावकामगार तलाठी यांचेकडे जमा केलेली आहे.

**६. त्याअर्थी मी, नवल किशोर राम, जिल्हाधिकारी, पुणे महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ मधील तरतुदीनुसार मला प्रदान असलेल्या अधिकारान्वये मौजे पांगारे, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे येथील रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे न्यू इंग्लिश स्कुल पांगारे यांचे शाळेच्या क्रिडांगणाकरीता प्रदान करणेत आलेल्या १८५८.०० चौ.मी. जागेस मुळ जागा प्रदान आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहून त्याचप्रमाणे दिनांक - १६/११/२०१८ चे शासन निर्णयामधील तरतुदीनुसार जमिनीच्या वार्षिक दर विवरणपत्रानुसार येणाऱ्या मुल्यांकनाच्या १० % रक्कमेच्या ०.१ % इतकी रक्कम त्या-त्या वर्षीच्या वार्षिक भुईभाडयाची रक्कम म्हणून शासन जमा करणेबाबतच्या तसेच शासकीय जमीन प्रदान केलेबाबतचा नमुना १८ चा बोर्ड सदर जागेतील इमारत/सिमाभिंतीच्या दर्शनी भागावर प्रदर्शित करणेबाबतच्या अटीवर दिनांक -०१/०१/२०१८ पासून दिनांक - ३१/१२/२०४८ या ३० वर्षांकरीता भाडेपट्टयाची मुदतवाढ देण्यात येत आहे.**

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी पुणे

प्रति,

सचिव, रयत शिक्षण संस्था सातारा, ता. जि. सातारा

जिल्हाधिकारी सत्यमेव जयते पुणे